मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका
जा.क्र./अति.म.आ.(ई)/२०४३.
दिनांक ०६/०१/१७.

## बैठकीचे इतिवृत्त

पुणे महानगरपालिका शहर फेरीवाला समितीची दि. ०२/१२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा. श्री. राजेंद्र जगताप : अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई)
२. मा. श्री. किशोर म्हसवडे : पोलिस निरीक्षक
३. श्री. ठाकूर : आरोग्य अधिकारी तथा सदस्य, शहर फेरीवाला समिती
४. सौ. संध्या गागरे : उप आयुक्त (अतिक्रमण) तथा निमंत्रक सदस्य शहर फेरीवाला समिती
५. शहर फेरीवाला समिती अंतर्गत इतर प्रवर्गातील सर्व सदस्य

सर्व प्रथम बैठकीमध्ये सदस्य व अतिक्रमण विभागाकडील मा. उपआयुक्त, अतिक्रमण निरीक्षक यांचा ओळखपरिचय करण्यात आला.

सदरबैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले आहेत.

| अ.क्र. | उपस्थित केलेला मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेला निर्णय व संबंधीत अधिकारी/विभाग |
|---|---|---|---|
| १ | प्रलंबित प्रकरणांबाबत | मागील तीन बैठकांमध्ये झालेल्या निर्णयांवर अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली दिसून येत नाही. कार्यवाही प्रलंबित आहे. या प्रलंबित प्रकरणांवरती तातडीने कार्यवाही करण्यात यावी असे सदस्य श्री. विनय पै सांगितले. | मागील तीन बैठकांमध्ये झालेल्या निर्णयांवर पुढील बैठकीपुर्वी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, तसेच त्याचा तपशिल पुढील बैठकीच्या कार्यपत्रिकेवर घेण्यात येईल, असे चर्चेमध्ये सर्वानुमते ठरले. **क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक/ अतिक्रमण निरीक्षक** |
| २ | सिंहगड रोडवरील सणस शाळेच्या शेजारी ओटा मार्केट बांधण्याचे काम चालू आहे. | सिंहगड रोडवरील सणस शाळेच्या शेजारी अनधिकृतरित्या ओटा मार्केट बांधण्याचे काम चालू आहे, असे श्री. संजय शंखे सदस्य यांनी सांगितले आहे. | श्री. संजय कुंभार, क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक यांनी समक्ष जागेवर पाहणी करुन त्याचा अहवाल ७ दिवसाच्या आत सादर करण्यात येईल असे मा. उपआयुक्त यांनी आदेश दिले. **श्री. संजय कुंभार क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | फूटपाथवर अनधिकृतपणे ठेवण्यात येणारे एम.एस.इ.बी बॉक्स, टेलीफोन बॉक्स, बस स्टॉपबाबत. | फूटपाथवर अनधिकृतरित्या उभारण्यात येणारे एम.एस.इ.बी बॉक्स, टेलीफोन बॉक्स, बस स्टॉप यामुळे पादचाऱ्यांना फूटपाथवरुन चालण्यास त्रास होतो, असे श्री. जुगल राठी सदस्य यांनी तक्रार केलेली आहे. तसेच रस्ता रुंदीकरणामुळे पी-१, पी-२ पार्किंगचे बोर्ड काढून टाकण्यात आले आहे. त्यामुळे पार्किंगचा दोन्ही बाजूला वापर होतो. | पथ विभागाकडून पॉलिसी तयार करण्यात आली आहे. त्याचे प्रेझेन्टेशन देण्यात यावे. श्री. भारत मोहिते कार्यकारी अभियंता यांनी पुढील बैठकीत प्रेझेन्टेशन देणेचे आदेश मा. अध्यक्ष यांनी दिले. पी-१ व पी-२ चे बोर्ड लावण्यात यावे. तसेच नो-हॉकर्स झोनच्या पाट्या लावणेबाबत संबंधीत विभागास कळविणेचा निर्णय घेण्यात आला.<br>**संबंधीत विभाग- पथ विभाग, मा. महापालिका सहाय्यक आयुक्त-क्षेत्रीय कार्यालय, वाहतूक नियोजन विभाग** |
| ४ | अतिक्रमण निर्मुलन कारवाईमधील जप्त करण्यात आलेला गोडावून माल सोडणेबाबत. | एक महिन्यापासून अतिक्रमण निर्मुलन कारवाईमध्ये जप्त करण्यात आलेला गोडावून मधील माल सोडणे बंद आहे, गोडावून मध्ये माल ठेवायला जागा अपूरी पडत आहे, त्यामुळे मच्छर, डास होतात. तसेच माल सोडण्याच्या वेळेस प्रमाणपत्र घेण्यात यावे. बिगाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी शहर फेरीवाला समितीच्या संघटनेच्या सदस्यांनी कळविले आहे. | एक महिन्यापासून अतिक्रमण निर्मुलन कारवाईमध्ये जप्त करण्यात आलेला गोडावून मधील माल सोडण्याचा आदेश मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांनी दिलेले आहेत. तसेच बिगाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतील असेही चर्चेमध्ये ठरले.<br>**संबंधीत विभाग - उप अधिक्षक गोडावून, अधिक्षक अतिक्रमण विभाग** |
| ५ | ४५ चौक नो हॉकर्स झोन व १५२ रस्तेबाबत मुख्य सभेमध्ये घेण्यात येणाऱ्या निर्णयाबाबत. | मुख्य सभेमध्ये ४५ चौक नो हॉकर्स झोन व १५२ रस्तेबाबत निर्णय तीन वर्ष प्रलंबीत आहे. तो लवकरात लवकर घेण्यात यावा, तसेच जागा सूचविताना राजकीय हस्तक्षेप नसावा असे सदस्यांनी सुचविले. मा. नगर सेवक/आमदार यांचेकडून लेखी आदेश आल्याशिवाय कारवाई करण्यात येऊ नये असे श्री. संजय शंखे यांनी सांगितले. | ४५ चौक व १५२ रस्तेबाबत मुख्य सभेमध्ये चर्चा करण्यात येईल असे, मा. सुभाष जगताप, सभासद यांनी सांगितले. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | बायोमेट्रिक सर्वेक्षण करणे कामी सर्व महा.सहा.आयुक्त कार्यालय पुणे मनपा कडे प्राप्त अर्जावर सर्वेक्षण करणे कामी मुदतवाढ देणेबाबत चर्चा करणे. | बायोमेट्रिक सर्वेक्षण २८०२५ पैकी संगणकीय नोंद २०२९७ व प्रमाणपत्र वाटप सख्यां १४५८४ वाटप करुन झालेले आहे. २८०२५ पैकी २०२९७ चे फक्त संगणकीय नोंद करण्यात आलेली आहे. जे राहिलेले आहेत त्यांना पेपर नोटीस काढली का? तसेच फक्त १४५८४ चे प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेली आहे. यंत्रणा असताना सुध्दा काम अपूर्ण राहिलेले आहे. ठेकेदार मे. सिध्दी एन्टंरप्रायझेस यांना दंड केला का? काळया यादीत नाव टाकले का? उप आयुक्त यांनी या प्रकरणाची चौकशी करावी, असे सदस्य श्री. संजय शंखे यांनी मागणी केलेली आहे. | पुढच्या बैठकीमध्ये हा विषय घेण्यात यावा. नवीन सर्वेक्षण करण्याच्या आधी जुन्या सर्वेक्षणाची अमंलबजावणी व सद्य स्थिती काय आहे याची माहिती घेणे. आपल्याकडे यंत्रणा माहिती असेल तर डाटा एन्ट्री ऑपरेटर घेऊन ते पूर्ण करु शकतो. पुणे महानगरपालिकाकडे मनुष्यबळ असूनही **अर्जांचे पात्र व अपात्र केलेले नाही.** २० डिसेंबर पर्यंत सर्व प्रलंबित प्रकरणे ४ क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक यांनी पूर्ण करण्यात यावीत. जुने अर्ज आहेत त्यांना नोटीसा देण्यात याव्यात. शहर फेरीवाला समितीकडे जे अ[illegible] येतील त्यास शहर फेरीवाला समिती मान्यता देईल, असे चर्चेमध्ये ठरले. **संबंधीत खाते – मा. महापालिका सहाय्यक आयुक्त-क्षेत्रीय कार्यालय, क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक/अतिक्रमण निरीक्षक/सहा. अतिक्रमण निरीक्षक** |
| ७ | कोंढवा-वानवडी महा.सहा.आयुक्त कार्यालयाकडील अधिकृत परवानाधारक कै. मंजुनाथ गोविंद शेट्टीगार यांचे स्टॉलला पर्यायी जागा देणेबाबत. | असे वैयक्तिक मुद्दे चर्चेला घेऊ नयेत, असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले. | सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करण्याचा निर्णय घेणेत आला. |
| ८ | चायनिज गाड्यांवरील कारवाईबाबत | चायनिज गाड्यांवरील कारवाई करण्याबाबत १५ दिवसांपूर्वी मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांनी आदेश दिले होते. त्यामुळे एकही चायनिजची गाडी रस्त्यावर दिसता कामा नये. तसेच क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक/अतिक्रमण निरीक्षक जागेवर उपस्थित नसतात, बिगारीच फक्त ऑफीसमध्ये असतात असे शहर फेरीवाला | मा. अध्यक्ष यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत की, एखादी चायनिजची गाडी रस्त्यावर दिसली तर तेथील प्रभागातील अधिकाऱ्यांना निलंबित करणेत येईल. क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक/अतिक्रमण निरीक्षक/सहा. अतिक्रमण निरीक्षक यांनी कामचे वेळेत गणवेश व ओळखपत्र वापरण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समितीच्या सदस्य दिनेश खराडे यांनी तक्रार केलेली आहे. | यावे, असे अध्यक्षांनी आदेश दिले. **संबंधीत खाते – क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक/अतिक्रमण निरीक्षक/सहा. अतिक्रमण निरीक्षक** |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग ४ अ, दि. ३ ऑगस्ट २०१६ मधील मार्गदर्शन तत्वावर चर्चा करणे. | महापालिकेला राज्य सरकारकडून ३ ऑगस्ट २०१६ ला शासन परिपत्रक पाठविण्यात आले नंतर जाणिव हॉकर्स संघटनेकडून ६ ऑगस्ट २०१६ ला आदेशाची तीन महिन्याच्या आत अमंलबजावणी करणेबाबत कळविण्यात आले. परंतू अद्यापही तसे झालेले नाही. तसेच राज्य शासनाकडे याबाबत कोणताही पाठपुरावा केलेला नाही त्यामुळे आप.णांस या परिपत्रकामधल्या सर्व बाबी मान्य आहेत असे समजण्यात येते, असे सदस्य श्री. संजय शंखे यांनी निदर्शनास आणून दिले. | राज्य सरकारकडून ३ ऑगस्ट २०१६ ला शासन परित्रक पाठविण्यात आलेले आहे हे परिपत्रक सर्व सदस्य यांना देण्यात यावे तसेच याचा अभ्यास करुन उप समिती बोलविण्यात यावी, त्यामध्ये निर्णय घेण्यात यावेत. त्याचा अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. तसेच शहर फेरीवाला समितीची एक वेगळी वेबसाईट तयार करण्यात येईल असा सर्वांनुमते निर्णय घेणेत आला. **वेबसाईट तयार करण्याचे काम श्री. नवाळी, शाखा अभियंता यांनी लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे.** **अतिक्रमण निरीक्षक/क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक** |

सर्व निरीक्षक/बिगारी सेवक यांना एक प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन सूचनेचे परिपत्रक काढण्यात यावे. परवानाधारकाने व्यवसायाच्या ठिकाणी जागेवर फोटोपास, प्रमाणपत्र ठेवले पाहिजे, ज्याच्याकडे नसेल त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. याबाबत अतिक्रमण निरीक्षक/सहा. अतिक्रमण निरीक्षक यांनी जागेवर जाऊन तपासणी केली पाहिजे. असे चर्चेमध्ये ठरविणेत आले. वरीलप्रमाणे बैठकीमध्ये चर्चा होवून निर्णय घेऊन बैठक संपन्न झाली.

(सौ. संध्या गागरे)
उप आयुक्त तथा निमंत्रक सदस्य
शहर फेरीवाला समिती
पुणे महानगरपालिका

(श्री. नरेंद्र ठाकूर)
आरोग्य अधिकारी
आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
तथा अध्यक्ष –शहर फेरीवाला समिती
पुणे महानगरपालिका

16-12-16 16-12-16

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सादर –
वरील सर्व संबंधित